FORM-1A

NCRB

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154196

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. ३६, वर्ष २०२२, दिनांक १३/१०/२०२२
   State, District, Police Station, FIR No., Year, Date
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलमे Sections कलम : ०७
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........
3. (a) अपराधाची घटना : वार ..........., तारीख पासून २४/०८/२०२२ वेळ १४:००वा. तारीख पर्यंत ०१/०९/२०२२ वेळ २०:३०वा.
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख १३/१०/२०२२, वेळ ...........
   Information received at P.S. Date, Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. २८/२०२२, तारीख १३/१०/२०२२ वेळ १३:१०वा.
   General Diary Reference : Entry No., Date, Time
4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी ..........., लेखी / तोंडी Written / Oral
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ०८ कि.मी. (पूर्व) चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S., Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव सायन रुग्णालय, ठिकाणाचे नंबर ..........., गल्ली ..........., रस्त्याचे नाव ...........
   Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..........., गाव ..........., पोस्ट ..........., तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ...........
   Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव सायन पोलीस ठाणे, तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ...........
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist., State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव अपूर्व अच्युत कुलकर्णी Name
   (b) वडिलाचे / पतीचे नाव अच्युत कुलकर्णी Father's / Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय ३७ वर्षे Date of Birth and Age
   (d) राष्ट्रीयत्व भारतीय Nationality, फोन नं. ९५५२५४९२१६ Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ..........., दिल्याचा दिनांक ..........., दिल्याचे ठिकाण ...........
   Passport No., Date of Issue, Place of Issue
   (f) व्यवसाय नोकरी Occupation
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
   (h) पत्ता रु. नं. २०, पहिला मजला, कळवा चंद्र भागी चांद्र विकास भवन, गल्ली / सर्व्हे क्र. / घर / नाव नं. ..........., फोन / मो. नं. ..........., पॅन नं. ..........., वोटर्स नं. ...........
   Address, Ward, House/Name No., Phone/Mo. No., PAN No., Card No.
   रस्त्याचे नाव सायन (प.), जवळचे प्रसिद्ध ठिकाण मुंबई - ५०, गाव ..........., पोस्ट ..........., पो. स्टे. ...........
   Road, Nearest identifiable place, Village, Post, P. Stn.
   तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य महाराष्ट्र, सध्याचा पत्ता ...........
   Taluka, Dist., State, Present Address
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   दत्ताराम अशोक साटम उर्फ अमित साटम वय ४८ वर्षे पद - लिपिक नेमणूक - लो टि म स रुग्णालय सायन मुंबई - ४०००२२

यातील फिर्यादी नामे श्री अपूर्व अच्युत कुलकर्णी, वय ३७ वर्षे यांचा आज दिनांक २३/१०/२०२२ रोजी स्वतंत्र कागदावर मराठीतुन संगणकावर टंकलिखित केलेली फिर्याद हिच नमुद गुन्ह्यातील प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष
Gaikwad
(अविनाश गायकवाड)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

(Dr. APOORVA KULKARNI)

फिर्याद

दि. १३/१०/२०२२

श्री. डॉ. अपूर्व अच्युत कुलकर्णी, वय ३४ धंदा— नोकरी (सायन रूग्णालय, सहाय्यक प्राध्यापक), पत्ता — अे २४, पारिजात, क्रिष्ण चंद्र मार्ग, वांद्रे रिक्लमेशन वांद्रे पश्चिम मुंबई ५०, मोबाईल क्र. ९५५२५४६४१६, आधार कार्ड क्र. ५७१९९९४२३४३९.

———•———

मी वरील प्रमाणे असून वर नमूद पत्यावर मागील ०६ महिन्यापासून राहत असून माझे सोबत माझे वडील नामे अच्युत वय ६७ वर्षे, आई सौ अर्चना वय ६५ वर्षे, पत्नी सौ आरती वय ३२ वर्षे व मूलगा अर्जित वय १.५ वर्षे असे रहावयास आहे. मी सायन रूग्णालय, सायन या ठिकाणी सहाय्यक प्राध्यापक या पदावर नोकरीस असून माझी पत्नी अपोलो स्पेक्टा रूग्णालय ताडदेव, मुंबई. या ठिकाणी नोकरी करते. आम्हा दोघांना मिळणारे पगारावर मी माझे कुटुबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी सायन रूग्णालय, सायन, मुंबई येथे पीडीयाट्रीक सर्जरी विभागामध्ये सहाय्यक प्राध्यापक (कॉन्ट्रक्ट) पदावर मागील दीड वर्षापासून कार्यरत आहे. माहे जून २०२२ मध्ये माझी नियमित पदासाठी निवड झाली. सदर पदाची कायमस्वरूपी ऑर्डर काढण्यासाठी सायन रूग्णालयाचे डीन ऑफिसचे क्लर्क अमीत साटम यानी माझ्याकडून रू ४,०००/— लाँचेची मागणी केली व दिनांक २९/०८/२०२२ रोजी मला कागदपत्र व लाचेची रक्कम ४,०००/— घेऊन त्यांच्या कार्यालयात बोलावले होते.

सायन रूग्णालयाचे डीन ऑफिचे क्लर्क अमीत साटम यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक २४/०८/२०२२ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. गायकवाड यांना भेटलो असता त्यांनी सायन रूग्णालयाचे डीन ऑफिचे क्लर्क अमीत साटम हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. मी माझा तक्रार अर्ज मराठी भाषेमध्ये लिहून दिला. पो.नि. गायकवाड यांनी सदर अर्जावर माझी सही घेतली. त्यानंतर पो.नि गायकवाड यांनी दोन शासकीय पंचांशी व सपोआ शिवराज ज. म्हेत्रे यांचेशी माझी ओळख करून दिली. पो.नि. गायकवाड यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. गायकवाड यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. गायकवाड यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज त्यांचे स्वतःचे ताब्यांत ठेवला.

त्यानंतर पो.नि गायकवाड यांनी दिनांक २९/०८/२०२२ रोजी पंचांसमक्ष सायन रूग्णालय, सायन, येथे डीन ऑफिसचे क्लर्क अमित साटम यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. पो.नि गायकवाड यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून के.ए.एस रोड मांटुगा पूर्व येथील पॅलासिनो बिल्डींगच्या समोरील फुटपाथवर शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि. गायकवाड यांनी सायन रूग्णालय, येथे डीन ऑफिस
या कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेंकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बाजुस असलेल्या
बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. देसाई यांचे सह पायी चालत गेलो. सायन हॉस्पीटल
येथे गेल्यानंतर लोकसेवक याचे कार्यालयात त्याचे सोबत कामाचे निमित्ताने बोलणे झाले. त्यावेळी तेथे
इतर लोकांची ये—जा चालू होती. त्यामुळे लाचेच्या रक्कम संदर्भात लोकसेवक यांचेशी स्पष्टपणे बोलने
झालेले नाही. मला पदावर कायमस्वरूपी करण्याच्या ऑर्डरवर अजून पर्यत साहेबांची सही झाली नसल्याचे
आणि सायंकाळी १७:०० वा पर्यत साहेब ऑफीसला आल्यास ऑर्डरवर सही घेतो. असे लोकसेवकाने
मला सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे.

दिनांक २९/०८/२०२२ रोजी लोकसेवक अमित साटम यांचेशी प्रत्यक्ष भेटून माझ्या
कामासंदर्भात चर्चा झाली परंतू लाचेच्या रक्कमे बाबत कोणत्याही प्रकारचे बोलणे झाले नाही व मला दि.
०१/०९/२०२२ रोजी माझे कामानिम्मित लोकसेवक साटम यांनी त्यांच्या कार्यालयात येण्यास सांगितले,
म्हणून पो.नि गायकवाड यांनी मला दिनांक ०१/०९/२०२२ रोजी ला.प्र.वि कार्यालयात येण्यास
सांगितले. त्यानंतर पो.नि गायकवाड यांनी दिनांक ०१/०९/२०२२ रोजी पंचांसमक्ष सायन रूग्णालय,

सायन डीन ऑफीस कार्यालय, तळमजला अमित साटम यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. पो.नि. गायकवाड यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. ०१/०९/२०२२ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालयात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. त्यानंतर पो.नि गायकवाड यांनी सदर दिवशी पंचांसमक्ष सायन रूग्णालय, सायन डीन ऑफीस कार्यालय, तळमजला अमित साटम यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असुन पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. गायकवाड यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून के.ए.एस रोड मांटुगा पूर्व येथील लिटल ऐंजल हायस्कुल च्या मिदास हा.सो च्या समोरील फुटपाथवर शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि.गायकवाड यांनी सायन रूग्णालय सायन डीन ऑफिस तळमजला अमित साटम यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. देसाई यांचे सह पायी चालत गेलो कार्यालयात लोकसेवक उपस्थित होते. माझेमध्ये व लोकसेवकामध्ये कामसंदर्भात चर्चा झाली. लोकसेवक यांनी मला असे सांगितले की, माझ्या ऑर्डर वर अदयापी सही झालेली नाही असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक अमित साटम व मी असे दोघे हॉस्पीटल चे डीन यांचे कार्यालयात गेलो. व तेथून माझी पदावर कायमस्वरूपी केल्याची ऑर्डर वर सही घेतल्यानंतर ऑफीसच्या बाहेर आलो. त्यांनतर लोकसेवक साटम व मी कार्यालयाच्या आवारातील मोकळया जागेत आलो. सदर ठिकाणी लोकसेवक साटम यांनी मला माझी प्रलंबित असलेली कायमस्वरूपी पदाच्या ऑर्डरची-कॉपी दिली त्यावेळी लोकसेवक साटम यांनी मला मिठाईची मागणी केली तसेच मी त्यांना सरानकडून यापुर्वी दोनच घेतले होते ते चालतील क? असे विचारले असता लोकसेवक साटम यांनी ठिक आहे, मला काम आहे असे बोलून तेथून निघून गेले.

त्यानंतर मी के.ए.एस रोड मांटुगा पूर्व येथील लिटल ऐंजल हायस्कुल च्या मिदास हा.सो च्या समोरील फुटपाथवर उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ परत आलो. पो.नि. गायकवाड यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. सायन रूग्णालय, सायन डीन ऑफीस कार्यालय, तळमजला येथील क्लर्क अमित साटम यानी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

तरी अमित साटम यांनी माझेकडे सायन रूग्णालय येथे पीडियाट्रीक सर्जरी विभागामध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून कायमस्वरूपी ऑर्डर करण्यासाठी दिनांक ०१/०९/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान स्वतःच्या फायदयाकरीता कायदेशीर परिश्रमाखेरीज २,०००/- रूपये लाचेच्या रक्कमेची व मिठाईची मागणी करून गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून माझी त्यांच्या विरूध्द फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली असता. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( अविनाश गायकवाड )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे फिर्यादीकडून तक्रारीच पडताळणी व चौकशी करून
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख व ठिकाणी आरोपी लोकसेवकाने फिर्यादी यांना सायन रुग्णालय येथे ऑर्थोपेडिक सर्जरी विभागामध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून कायमस्वरूपी ऑर्डर करण्याकरिता दिनांक ०३/१०/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान स्वतःच्या फायद्याकरिता कायदेशीर पारिश्रमिकेशिवाय रुपये २,०००/- लाचेच्या रकमेची व मिठाईची मागणी केली म्हणून त्यांचेविरुद्ध कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
अविनाश गायकवाड पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ................, जिल्हा ................, राज्य ................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank.............. No.............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................. (3) Transferred to P. S. ..................................
District.................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

INSPECTOR OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name अविनाश गायकवाड
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई
Posting
Code No. of I. O. ................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख................
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**